# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,

## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**१४) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १७.०४.२०२६**

जिल्हा : अहिल्यानगर

| मागील आठवड्यातील हवामान (१०/०४/२०२६ ते १६/०४/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१८/०४/२०२६ ते २२/०४/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | < दिनांक > | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | १० | ९ | ५ |
| ३५.६ | ३५.८ | ३६.४ | ३८.२ | ३९.२ | ४१.४ | ४१.२ | कमाल तापमान (अंसे) | ४० | ३९ | ३९ | ३८ | ३८ |
| १६.५ | १६.७ | १६.९ | १७.३ | १८.३ | १८.९ | १९.१ | किमान तापमान (अंसे) | १९ | २० | २२ | २२ | २१ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ढग स्थिती (आकाश) | ५ | २ | ३ | १ | २ |
| ७२ | ७० | ७० | ६८ | ६६ | ६२ | ६३ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ३० | ३२ | ४४ | ४७ | ४३ |
| ३४ | ३२ | २९ | २८ | २६ | २७ | २८ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ८ | १० | ११ | १३ | १४ |
| २.० | १.८ | १.७ | १.३ | १.२ | १.२ | १.३ | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | १२ | १४ | ९ | ८ | १० |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार **दि. १७ व १८ एप्रिल रोजी उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे. तसेच दि. २० ते २२ एप्रिल रोजी काही ठिकाणी विजांच्या कडकडाट व जोराच्या वाऱ्यासह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | १) हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल अ‍ॅपचा वापर करावा.<br>२) मातीतील ओलावा वाचवण्यासाठी अच्छादनाचा वापर करावा, त्याकरीता गवताचा/ पिकाचे अवशेष/ पॉलिथीनचा उपयोग करावा.<br>३) उष्णतेच्या लाटेची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी स्वताची व जनावराची काळजी घ्यावी. |
| संदेश | | **दि. १७ व १८ एप्रिल रोजी उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे. तसेच दि. २० ते २२ एप्रिल रोजी काही ठिकाणी विजांच्या कडकडाट व जोराच्या वाऱ्यासह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| कांदा | काढणी | कांदा काढणीनंतर शेतात वाळविताना ढीग न करता पहिला कांदा दूस-या कांद्याच्या पातीने झाकून जाईल असा एकसारखा पसरून वाळवावा, त्यानंतर ३-५ सेमी कांद्याची मान ठेवून पात कापावी व २ आठवडे सावलीत वाळवावा. |
| कांदा | काढणी | विजांच्या कडकडाट व जोराच्या वाऱ्यासह हलक्या पाऊसाची शक्यता असल्याने कांद्याची काढणी शक्य तितक्या लवकर करा आणि काढलेला कांदा सुरक्षित ठिकाणी ठेवा. |
| उन्हाळी भुईमूग | शेंगा पोसण्याची अवस्था | भुईमुग पिकास शेंगा पोसण्याच्या अवस्थेत (६५ ते ७० दिवस) पाण्याचा ताण पडू देऊ नये. या अवस्थेत संरक्षित पाण्याची पाळी गरजेप्रमाणे द्यावी. |
| ऊस | वाढीची अवस्था | मे महिन्यामध्ये सरासरी बाष्पीभवनाचा वेग ९.२४ प्रति दिवस एवढा असतो ऊस पिकास दररोज ९.३३ लिटर पाण्याची आवश्यकता असते त्यासाठी ठिबक सिंचन संच (४ लिटरचा ड्रीपर) दररोज २ तास २० मिनिटे चालवावा.<br>सुरू ऊस लागवडीनंतर १६ ते १८ आठवड्यांनी रासायनिक खतांची मात्र देऊन पहारीच्या औजाराने वरंबे फोडून आंतर मशागत करावी व सायन कुळव रिजरने मोठी बांधणी करावी.<br>मोठ्या बांधणीच्या वेळी रासायनिक खतांची मात्रा नत्र १३६ किलो (युरिया २९५ किलो), स्फुरद ८५ किलो (सिंगल सुपर फॉस्फेट ५३१ किलो) व पालाश ८५ किलो (म्युरेट ऑफ पोटॅश १४२ किलो) प्रती हेक्टरी याप्रमाणात द्यावी. |
| भाजीपाला पिके | | उष्णतेच्या लाटेची शक्यता असल्याने नुकत्याच लागवड झालेल्या रोपाना सावली करण्याची व्यवस्था करावी. गरम वाऱ्याला अडथळा निर्माण होण्याकरीता शेताच्या कडेला, बांदावर व्यवस्था करावी. |
| भाजीपाला पिके | | विजांच्या कडकडाट व जोराच्या वाऱ्यासह हलक्या पाऊसाची शक्यता असल्याने, काढणीला आलेल्या भाजीपाला पिकांची काढणी/ तोडणी शक्य तितक्या लवकर करावी. |
| फळ पिके | | उष्णतेच्या लाटेची शक्यता असल्याने उभ्या फळ पिकांना पाण्याचा ताण बसणार नाही याची दक्षता घ्यावी त्याकरीता पिकांना आवश्यकतेनुसार हलके सिंचन द्यावे. नविन लागवड केलेल्या फळाबागांच्या कलमी रोपांचे |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| | | उन्हापासून संरक्षण करावे. गंभीर वाढीच्या टप्प्यावर सिंचनाची वारंवारता वाढवावी. |
| **फळ पिके** | | विजांच्या कडकडाट व जोराच्या वाऱ्यासह हलक्या पाऊसाची शक्यता असल्याने, फळबागांचे वाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी, बांबू किंवा लाकडी काठ्यांच्या आधाराने झाडे प्लास्टिकच्या दोऱ्यांनी एकमेकांना बांधावीत. |
| **पशुसंवर्धन** | | उष्णतेच्या लाटेची शक्यता असल्याने, जनावरांना सावलीत ठेवावे आणि पिण्यास भरपूर स्वच्छ आणि थंड पाणी द्यावे. जनावरांकडून सकाळी १२ ते दुपारी ३ वाजेच्या दरम्यान काम करू घेवु नये. हिरवेगवत, प्रथिनेयुक्त, खनिजमिश्रणआणिमीठयुक्त खाद्य द्यावे. जनावरे सकाळी किवा सायंकाळी चरावयास न्यावे. तापमान कमी करण्यासाठी शेडचे छत पेंढ्याने झाकावे तसेच भिंतींना पांढरे रंग द्यावा किंवा भिंतींना शेण-मातीचा लेप लावावा. |
| **पशुसंवर्धन** | | विजांच्या कडकडाट व जोराच्या वार्यानसह हलक्या पाऊसाची शक्यता असल्याने, जनावरांना चरायला सोडू नका. गारपिटीमुळे होणारी इजा टाळण्यासाठी जनावरांना सुरक्षित ठिकाणी ठेवा. जनावरांच्या निवाऱ्याचे छप्पर चांगल्या स्थितीत असले पाहिजे. |
| **कुक्कुटपालन** | | उष्णतेच्या लाटेची शक्यता असल्याने, पोल्ट्री हाऊसमध्ये पडदे लावावेत आणि हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी. तसेच भिंतींना पांढरे रंग द्यावा किंवा भिंतींना शेण-मातीचा लेप लावावा. |
| **कुक्कुटपालन** | | विजांच्या कडकडाट व जोराच्या वार्यानसह हलक्या पाऊसाची शक्यता असल्याने, कोंबड्यांना सुरक्षित ठिकाणी ठेवावे. |

**स्त्रोत** :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि, राहुरी.

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.

दि. : १७.०४.२०२६

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**

**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**